# नवी मुंबई महानगरपालिका
## शिक्षण विभाग

वाचाः- १. दिनांक १३/०३/२०२० रोजीचे मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे कोरोना विषाणू संसर्गाबाबतचे निवेदन.
२. शासन अधिसुचना, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन क्र.करोना२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५, दिनांक १४/०३/२०२०.
३. मा.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.नमुंमपा/आरोग्य/१५०४/२०२०, दिनांक १५/०३/२०२०.
४. मा.आयुक्त (शिक्षण) यांचे जाक्र.यिअर/२०/(ता.३५४/कोरोना/आस्था क्र.१४४, दिनांक १६/०३/२०२०.
५. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.१०१/एसडी-४, दिनांक १४/०३/२०२०.
६. विभागीय शिक्षण उपसंचालक, पूणे यांचे जा.क्र.शिउसं/उ.मा.-४०४/२०२०/२३३१, दिनांक १५/०३/२०२०.

---

**अत्यंत महत्वाचे/तातडीचे**

जा.क्र.नमुंमपा/शिक्षणविभाग/६४६/२०२०
दिनांकः-१८/०३/२०२०

**आदेशः-**

ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हीड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाभ् महाराष्ट्र राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक अधिनियम १८९७ ची अंमलबजावणी दिनांक १३/०३/२०२० पासून सुरु करण्यांत आलेली आहे. त्यामधील खंड २, ३ व ४ नुसार कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगांचा प्रतिबंधव नियंत्रण करणेसाठी महानगरपालिका आयुक्त हे सक्षम प्राधिकारी म्हणून महापालिका कार्यक्षेत्रासाठी घोषित करण्यात आलेले आहेत.

त्याअर्थी महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोना विषाणूवर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे, त्या करणेसाठी महापालिका आयुक्त हे सक्षम प्राधिकारी म्हणून काम पाहतील.

ज्याअर्थी कोरोना विषाणूचा होणार प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा भाग म्हणुन महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषदा, सर्व सरकारी व खाजगी शाळा तसेच महाविदयालय, खाजगी क्लासेस व आयुक्त व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ अन्वये निर्गमित करणेत आलेली अधिसुचना व नियमावली मधील तरतुदी नुसार सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने दिनांक ३१/०३/२०२० पर्यंत बंद ठेवणेबाबत याद्वारे सुचित करण्यात आले आहे.

यास्तव उपरोक्त नुसार नवी मुंबई महानगरपालिका शाळांमध्ये कार्यरत असणारे सर्व प्र.विस्तार अधिकारी, प्र.केंद्रसमन्वयक, शिक्षकेतर कर्मचारी (कायम व करार), सफाई कामगार, बहूउद्देशीय कामगार व सुरक्षारक्षक वगळता सर्व कायम प्राथमिक व माध्यमिक शाळांतील शिक्षक, ठोक मानधनावरील प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील शिक्षक, शिक्षण सेवक, बालवाडी शिक्षिका, बालवाडी मदतनीस, विषयतज्ञ, विषयतज्ञ (IE) विशेष शिक्षक, यांनी तसेच नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्व व्यवस्थापनाच्या खाजगी अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित (State/CBSE/ICSE/IG/IB Boards) शाळांमध्ये कार्यरत असणारे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी दिनांक १८/०३/२०२० ते दिनांक ३१/०३/२०२० पर्यंत पुढील आदेश निर्गमित होईपर्यंत कर्तव्यावर हजर राहु नये.

(अण्णासाहेब मिसाळ, भा.प्र.से.)
आयुक्त
नवी मुंबई महानगरपालिका